# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

## महाराष्ट्र , पुणे

# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा

## सन

## २०२१-२०२२

## गट - प्राथमिक शिक्षक

# नवोपक्रमाचे नाव : “जिथे लागे बालकांना लळा, अशी माझी घरोघरी शाळा”


**नवोपक्रमकर्त्या शिक्षकाचे नाव :- श्रीमती. विधाटे शर्मिला अशोक**

Email :- sharmiladokhe@gmail.com

मो.क्र. 9975802208


मार्गदर्शक :-डॉ.रवी जाधव सर (जेष्ठ अभिव्याख्याता डायट औरंगाबाद)


शाळा :- जिल्हा परिषद प्राथ. शाळा लेंभेडोखे वस्ती ,

केंद्र-लाडगाव, ता. वैजापूर, जि.औरंगाबाद.

Udise No :- 27190804402

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ०१ | शिक्षक परिचय | ३ |
| ०२ | नवोपक्रामाचे  शीर्षक | ४ |
| ०३ | नवोपक्रमाची गरज व महत्व | ८ |
| ०४ | नवोपक्रामाचे  उद्दिष्टे | १६ |
| ०५ | नवोपक्रामाचे  नियोजन | १७ |
| ०६ | नवोपक्रमाची कार्यपद्धती | २५ |
| ०७ | नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पत्ती | ३१ |
| ०८ | समारोप | ३५ |
| ०९ | संदर्भ सूची व परिशिष्टे | ३७ |
| १० | प्रतिज्ञापत्र | ४६ |
| ११ | प्रमाणपत्र | ४६ |

# शिक्षक परिचय



**शिक्षकाचे नाव -** श्रीमती विधाटे शर्मिला अशोक

**पद -** सहशिक्षिका

**शाळेचे नाव व पत्ता -** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लेंभेंडोखेवस्ती

**केंद्र –** लाडगाव, **तालुका –** वैजापुर, **जिल्हा -** औरंगाबाद

**यु डायस क्रमांक -** 27190804402.

**मोबाईल क्रमांक -** 99 75 802 208

**जन्मदिनांक -** 15 / 5 /1989

**सेवा आरंभ दिनांक -** 16 /8/ 2010

**शैक्षणिक अर्हता -** बी.ए ,डी.एड.

**सध्याच्या शाळेवर नियुक्ती** - 16/ 8 /2010

**कायमचा पत्ता -** मु पो पुणतांबा, तालुका- राहता, जिल्हा –अहमदनगर

**पिन कोड -** 413 707

**एकूण सेवा -** 11 वर्षे 2 महिने

## नवोपक्रमाचे शीर्षक – " जिथे लागे बालकांना लळा अशी माझी घरोघरी शाळा."

# प्रस्तावना

कोरोना महामारी च्या काळात सर्वत्र शाळा बंद होत्या. विद्यार्थ्यांची अध्ययन पातळी टिकून राहावी, व ती वाढावी त्यांच्या त्या त्या इयत्तेच्या क्षमता पूर्ण करण्यासाठी ऑनलाइन शिक्षण सर्व विद्यार्थ्यांचे सुरू केले, परंतु यालाही मर्यादा होत्या,ज्या पालकांची आर्थिक परिस्थिती फार बिकट अशा विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा प्रश्न सोडवणे गरजेचे होते किंवा मोबाईल असला तरी नेटवर्क नसणे रिचार्ज करण्यासाठी पैसे नसणे या व इतर अनेक कारणांना हा पर्याय म्हणून घरोघरी शाळा हा उपक्रम राबविला.

सोशल मीडियावर श्री. खरात सर यांची संकल्पना असलेला हा उपक्रम माझ्या पाहण्यात आला. त्यांच्याकडून मार्गदर्शनही मिळवले आमच्या केंद्रप्रमुखांची परवानगी मिळाल्यानंतर हा उपक्रम सुरू केला. या उपक्रमात सर्व विद्यार्थ्यांच्या घरातच ज्याची त्याची स्वतंत्र शाळा तयार केली. त्यासाठी अगोदर प्रत्येक विद्यार्थ्याचा अध्ययन स्तर निश्चित केला. त्याप्रमाणे शैक्षणिक साहित्य तयार करून त्यांच्या घरातील भिंतीवर लावले.जे विद्यार्थी अभ्यास कमी व खेळ जास्त या गटात मोडतात त्यांच्यासाठी घराच्या आत व बाहेर जिथे जिथे जागा असेल उदाहरणार्थ पाण्याच्या रिकाम्या टाक्या, शेडचे खांब, तुळस, शेती चे पाईप, फरशी, घरातील भिंती इत्यादी ठिकाणी शैक्षणिक पेंटिंग करून दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली.

याचा फायदा असा झाला की विद्यार्थ्यांच्या घरातच शाळा तयार झाल्याने ते कधीही व कोणत्याही वेळी पालकांच्या मदतीने अध्ययन करू लागली. पालक सुद्धा मुलांचा अभ्यास आवडीने घेऊ लागलेत. पहिली च्या विद्यार्थ्यांचा विचार केला तर त्यांनी अजून शाळाच पाहिली नव्हती मग त्यांच्या घरातच शाळा निर्माण झाल्याने गुणवत्ता वाढण्यास नक्कीच उपयोग झाला.

माझ्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या बाबतीत घरोघरी शाळा या अभिनव उपक्रमाने जणू नवोदयच घडून आला.

**" जिथे लागतो बालकांना लळा, अशी माझी घरोघरी शाळा "**

# HOME EDUCATION

**1 【H】 - Healpfull to all (सर्वांना उपयुक्त)**

A. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना उपयुक्त

B. मोठ्या वर्गातील विद्यर्थ्यांनाही उपयुक्त

C. प्रौढ साक्षरतेस मदत

**2. 【O】 Opportunity (संधी)**

A. पालक - शिक्षक सुसंवादाची संधी

B. आनंददायी शिक्षणाची संधी

C. पालकांना मुलांचे शिक्षक होण्याची संधी

**3. 【M】 Managed Learning Environment**

(व्यवस्थापित शिक्षण वातावरण)

A. घरातच शाळेचे वातावरण तयार करणे

B. अध्ययन अध्यापनात मुलांना गुंतवून ठेवणे

C. गृहभेटीद्वारे मार्गदर्शन

4. 【E】 Education (शिक्षण)

A. कोरोना काळातही शिक्षण उपलब्ध

B. अखंड अध्ययन अध्यापन प्रक्रिया

C. सुरक्षित वातावरणात शिक्षण

5. 【S】 Success (यश)

A. गुणवत्ता टिकवण्यात व वाढण्यास मदत

B. विद्यार्थी अभ्यासात रमले.

C. शाळा बंद व शिक्षण अखंड चालू राहिले.

6. 【C】 Co-operative system (सहकारी प्रणाली)

A. सर्व पालकांचे शिक्षकांना मोलाचे सहकार्य लाभले.

B. घरातील सर्व च व्यक्तींची शिक्षण प्रक्रियेत मदत.

C. शिक्षक-विद्यार्थी सुसंबंध सलोख्याचे झाले.

7. 【H】 Higher (उच्चतम)

A. पालकांच्या अपेक्षा पूर्ण झाल्या.

B. विद्यार्थी गुणवत्ता वाढली.

C. स्वयंअध्ययनास विद्यार्थी प्रोत्साहित

8. 【O】Organised (आयोजित)

A. पालक- विद्यार्थी -शिक्षक त्रिसूत्री पूर्ण होण्यास मदत

B. आनंददायी वातावरणात शिक्षण

C. स्वनिर्मित साहित्याद्वारे स्वयंअध्ययन आयोजित

9. 【O】Occured (घडविणे)

A. कोरोना काळात सुद्धा विद्यार्थी घडले व शिक्षण प्रक्रियेत टिकून राहिले.

B. ज्ञानरचनावादी अध्ययन अध्यापन.

C. पालक -विद्यार्थी- शिक्षक सुसंवाद अधिकाधिक सहजव सोपा झाला.


10. 【L】 Learning (शिक्षण)

A. ज्ञानरचनावादी अध्ययन- अध्यापन झाले.

B. हसत खेळत आनंददायी शिक्षण

C. हवे तेंव्हा शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली.

# नवोपक्रमाची गरज व महत्व




**1.उपक्रम निवडण्याचे कारण :-**

**A. online शिक्षणास मर्यादा**

माझ्या शाळेतील सर्व पालकांकडे मोबाईल आहेच असे नाही. 50% टक्के पालकांकडे मोबाईल आहे, परंतु उर्वरित पालकांचं काय? माझे विद्यार्थी 50% ऑनलाईन शिक्षणास हजर राहत होते परंतु उर्वरित 50 टक्के विद्यार्थी उपस्थित नसल्यामुळे त्यांचे होणारे शिक्षणाचे नुकसान हे भरून कसे काढायचे हा प्रश्न होता. त्याचप्रमाणे बरेच पालकांची आर्थिक परिस्थिती नव्हती.काही पालकांकडे मोबाईल घेण्यासाठी पैसे नव्हते. त्याचप्रमाणे काही ठिकाणी रेंज चा प्रॉब्लेम होता किंवा बरेच विद्यार्थी हे मोबाईल समोर सतत बसून बसून कंटाळले होते, कारण पालकांना वाटायचं की आपली मुलं मोबाईलवर गेम खेळतात, गाणे ऐकतात,चित्रपट पाहतात, किंवा कार्टून बघतात, परंतु या सर्व गोष्टींसाठी एकच पर्याय होता तो म्हणजे सर्व विद्यार्थ्यांपर्यंत अगदी त्यांच्या घरी जाऊन नवोपक्रम राबवून त्यांची गुणवत्ता सुधारणे. अशा अनेक अडचणी ऑनलाइन शिक्षणात होत्या. त्याच प्रमाणे ऑनलाइन क्लास झाल्यानंतर सर्व विद्यार्थी अभ्यास करत नव्हते, क्लास चालू आहे तोपर्यंत विद्यार्थी मोबाईल समोर बसून असतात परंतु क्लास संपल्यानंतर विद्यार्थी लगेच खेळायला जात,त्यामुळे फक्त एकच तास ऑनलाईन शिक्षण घेऊन चालणार नव्हतं तर अखंडपणे विद्यार्थी शिक्षण प्रवाहात गुंतून राहण्यासाठी मला प्रत्यक्ष विद्यार्थ्यांपर्यंत जाऊन नवोपक्रम राबवणे गरजेचे होतं अशा प्रकारे अनेक अडचणी ऑनलाइन शिक्षणात होत्या.

**B. पालकांची आर्थिक परिस्थिती**

सर्व विद्यार्थ्यांचे पालक हे शेतकरी असल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती मध्यम असल्याने ते आपल्या मुलांना सर्व साहित्य अध्ययनासाठी घेऊन देऊ शकत नव्हते .एकंदरीत त्यांच्या घरातील वातावरणाचा, विद्यार्थ्यांच्या परिस्थितीचा विचार करून विद्यार्थ्यांपर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोच करणंही गरजेचं होतं.कारण पालकांची आर्थिक परिस्थिती नसल्याने ते विद्यार्थ्यांना मोबाईल घेऊन देऊ शकत नव्हते किंवा त्यांना ऑनलाइन शिक्षणासाठी सर्व साहित्य पुरवू शकत नव्हते व त्याचप्रमाणे अभ्यासासाठी लागणारे साहित्य सुद्धा पुरवू शकत नव्हते तर यासाठी विद्यार्थ्यांपर्यंत जाऊन त्यांना सर्व साहित्य पुरवून त्यांची गुणवत्ता टिकून ठेवणे व त्यांना अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत अखंडपणे वाहत ठेवण्यासाठी उपक्रमाची गरज होती त्यासाठी हा उपक्रम मी निवडला.

**C. गुणवत्ता वाढवणे**

नियमित शाळा चालू असताना माझे सर्व विद्यार्थी हे गुणवत्तापूर्ण शिक्षण घेत होते व सर्व विद्यार्थी अध्ययन-अध्यापन प्रक्रियेचा आनंद घेऊन सर्व अध्ययन निष्पत्ती प्राप्त करून अगदी प्रथम श्रेणी मध्ये जात होते. परंतु कोरोना काळातील या संकटामुळे विद्यार्थ्यांशी असणारा संपर्क तुटला, त्यामुळे त्यांची गुणवत्ता खालावली आणि ही गुणवत्ता वाढविण्यासाठी दर्जेदार असा नवोपक्रम राबवणे मला गरजेचं वाटलं. सर्व पालकांना आपली मुलं नियमीत शाळा चालू होत्या तेव्हा किती हुशार होती असे वाटायचे परंतु आता या कोरोणाच्या वातावरणात विद्यार्थी गुणवत्ता घसरत चाललेली आहे, तर त्यासाठी पालकांना सुद्धा वाटत होते की काहीतरी करून आपली मुलं हे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण घेऊन कोरोना संकटावर मात करून अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत सामील होतील व दर्जेदार शिक्षण मिळवून नेहमी पुढे राहतील.

त्यामुळेच गुणवत्ता वाढवणे यासाठी हा नवोपक्रम राबवन मला गरजेचं वाटलं.

**D. कोरोना महामारीवर मात**

आज संपूर्ण जगात जे कोरोना ने थैमान घातले आहे, या नैसर्गिक संकटावर मात करून आपले विद्यार्थी दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण घेण्यासाठी नवोपक्रमाची मला गरज वाटली. आजच्या या कोरोणा च्या काळामध्ये सर्व विद्यार्थी शाळेपासून त्यांच्या आवडत्या शिक्षकांपासून दुरावले आहेत परंतु ही सर्व परिस्थिती पुन्हा जुळवून आणण्यासाठी व कोरोणा महामारी वर मात करून माझे विद्यार्थी शिक्षणात सदैव पुढे राहण्यासाठी हा नवोपक्रम राबवण्याचं ठरवलं. कोरोणा महाभारी वर मात करून माझे सर्व विद्यार्थी गुणवत्तापूर्ण शिक्षणा मिळविण्यात यशस्वी ठरले.त्यामुळे हा काळ संकटाचा आहे असे पालकांना व मला अजिबात वाटले नाही,आणि विद्यार्थीसुद्धा भीतीयुक्त वातावरणात अगदी सुरक्षितरीत्या घरात राहून अध्ययन करू लागले.

# उपक्रमाचे वेगळेपण

स्वतःच्या घरातच शाळा

घरातील सदस्यांच्या मदतीने शिक्षण

सोयीनसार शिक्षण

घरात व बाहेरील परिसरातील अध्ययन

सगळीकडे शैक्षणिक वातावरण

**2.नवोपक्रमाचे वेगळेपण**

**a. स्वतःच्या घरातच शाळा:-**



आत्तापर्यंत आपण बघत आलो की, सर्व विद्यार्थी हे शिक्षण घेण्यासाठी शाळेमध्ये जात होते, परंतु या नैसर्गिक कोरोणाच्या संकटावर मात करून मी माझ्या सर्व विद्यार्थ्यांच्या घरामध्ये ज्याची त्याची स्वतंत्र शाळा तयार करून दिली. ही संकल्पना पालकांना अतिशय आवडली कारण यामध्ये स्वतःच्या घरालाच शाळेचे स्वरूप आलेलं होतं आणि आपली मुलं हवे तेव्हा अभ्यास करू शकणार होते. त्यामुळे पालक वर्ग हा अतिशय आनंद होता आणि विद्यार्थी सुद्धा हसत खेळत आनंददायी वातावरणात आई-वडिलांच्या सोबतीने,मोठ्या बहिण भावंडांच्या मदतीने व आज्जी आजोबा यांच्या

सहकार्याने सुद्धा अभ्यास करणार होते. त्यामुळे स्वतःच्या घरातील शाळा पाहून माझे सर्व विद्यार्थी अतिशय आनंदी झाले व अतिशय जोमाने व उत्साहाने अभ्यास करू लागली. कारण त्यांना स्वतःच्या घरातील शाळेतच शिकण्याचा एक वेगळा आनंद मिळू लागला

**b. घरातील सदस्यांच्या मदतीने शिक्षण**



घरातील आजी नातवंडांचा अभ्यास घेताना

सर्व विद्यार्थ्यांच्या घरात मी स्वतः घरोघरी शाळा निर्माण केली. तर या शाळेमध्ये सर्व विद्यार्थी हे घरातील सदस्यांच्या मदतीने शिक्षण घेणार होते आणि या साठी विद्यार्थ्यांचे सर्व पालक तयार होते.कारण कोरोना च्या काळामध्ये मिळालेली ही त्यांना संधी होती, की आपणच आपल्या मुलाचे गुरू. अशा पद्धतीने सर्व विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन मी स्वतः त्यांच्या शाळा तयार करून दिल्यानंतर आवश्यक तेथे अध्ययन उपयुक्त तक्ते लावून व त्याचप्रमाणे स्वनिर्मित शैक्षणिक साहित्य टोपल्यांत ठेवून त्यांच्या घरालाच शाळेचे स्वरुप दिल्यानंतर सर्व विद्यार्थी हे माझ्या मदतीने व घरातील सदस्यांच्या मदतीने अतिशय छान पद्धतीने शिक्षण घेऊ लागली. काही अडचणी आल्या तर मी त्यांच्या घरी जाऊन त्यांना मार्गदर्शन व नियमित गृहभेटी द्वारे त्यांना अभ्यास देऊ लागले व तपासू लागले. यात घरातील सर्व सदस्यांचा अतिशय मोठा आणि महत्त्वाचा वाटा आहे कारण 24 तास विद्यार्थी हे त्यांच्या सहवासात असल्यामुळे ते घरातील सर्व सदस्यांच्या मदतीने शिक्षण घेऊ लागले.

**c. सोयीनुसार शिक्षण**

नियमित शाळा चालू असतांना तरी सर्व विद्यार्थी हे शाळेच्या नियमित वेळेत बांधील होते. परंतु आता या कोरोना महामारी च्या संकटावर मात करुन सर्व विद्यार्थ्यांच्या घरात मी जी काही घरोघरी शाळा निर्माण तयार केली, तर यामध्ये सर्व विद्यार्थी अगदी त्यांच्या सोयीनुसार शिक्षण घेणार होते. यात ते त्यांना हव्या त्या त्या वेळी, हवे तेंव्हा,त्यांना आवडेल तेंव्हा शिक्षण घेणार होते. कारण 24 तास सर्व तक्ते व अध्ययन उपयुक्त शैक्षणिक साहित्य हे त्यांच्या नजरेसमोर राहणार होते. त्यामुळे मुलांना त्यांच्या मनात आले  तर किंवा वाटेल तेव्हा ती अगदी त्यांच्या सोयीनुसार शिक्षण घेऊ लागली. आणि सर्व मुलांचे पालक सुद्धा त्यांच्या सोयीनुसार आपल्या मुलांना मार्गदर्शन करू लागली.

**d. घरात व बाहेरील परिसरातील अध्ययन साहित्य :-**




सदर अभिनव नवोपक्रमात सर्व विद्यार्थ्यांच्या घरात ज्याची त्याची स्वतंत्र शाळा तयार करण्यासाठी, मी स्वतः विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांच्या घरातील एक खोली घेतली. ती पण पालकांच्या सहकार्याने आणि मग त्यानंतर हा अभिनव नवोपक्रम सादर करण्यास सुरुवात केली. त्यांच्या घराला शाळेचे स्वरूप दिले. घरातील भिंतीवर उपयुक्त शैक्षणिक तक्ते व स्वनिर्मित शैक्षणिक साहित्य टोपल्यांत ठेवून संपूर्ण त्यांच्या घरातील एक खोली शाळेसारखी तयार करून दिली. व त्याचप्रमाणे त्यांच्या घरातील भिंतीवर पाढे लिहिले, १ ते १०० अंक लिहिले, एबीसीडी लिहिली, व त्याचप्रमाणे जे विद्यार्थी अभ्यास कमी व खेळ जास्त या गटात मोडतात अशा विद्यार्थ्यांसाठी घराबाहेरील रिकाम्या पाण्याच्या टाक्या, पडवी, शेडचे खांब,घराचे खांब या सर्व ठिकाणी उपयुक्त

शैक्षणिक पेंटिंग उपलब्ध करुन दिली. व त्याचप्रमाणे त्यांना खेळण्यासाठी सापशिडीची सुद्धा पेंटिंग केली आणि याचा फायदा असा झाला की सर्व विद्यार्थी घरात गेल्यानंतर सुद्धा शाळा, आणि घराच्या बाहेर खेळायला आल्यानंतरसुद्धा शाळा यामुळे सर्व विद्यार्थी अध्ययन अध्यापन प्रक्रियेत हसत खेळत आनंददायी वातावरणात गुंतून राहिले व अध्ययन करू लागले.

**e. सगळीकडे शैक्षणिक वातावरण**

एकंदरीत सर्व विद्यार्थ्यांच्या घरात व घराच्या बाहेर शैक्षणिक वातावरण या घरोघरी शाळा नवोपक्रमाद्वारे मी उपलब्ध करून दिले.आणि या शैक्षणिक वातावरणाचा फायदा कोरोणासारख्या महामारीत सुद्धा विद्यार्थ्यांना गुणवत्ता सुधारण्यासाठी नक्कीच फायदा झाला.आणि अशा पद्धतीने या शैक्षणिक वातावरणात विद्यार्थी अध्ययन अध्यापन प्रक्रिया अतिशय आनंदाने व उत्साहात करू लागले.

## (3) नवोपक्रमाची उपयुक्तता :-




**a. विद्यार्थी गुणवत्ता वाढली:-**

अगदी सुरुवातीला जून 2021 साली जेंव्हा विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासली, तेव्हा विद्यार्थ्यांना स्वतःचे नाव लिहता येत नव्हते, किंवा दोना चा पाढा सुद्धा म्हणता येत नव्हता. परंतु हा नवोपक्रम मी प्रत्यक्ष राबवल्या नंतर जेव्हा विद्यार्थ्यांच्या घरातच स्वतःची शाळा साकार झाली तर या

घरोघरी शाळेच्या  मदतीने विद्यार्थी स्वयं अध्ययन करून किंवा पालकांच्या मदतीने व शिक्षकांच्या मदतीने अभ्यास करून त्यांच्यातील गुणवत्ता ही अतिशय छान पद्धतीने सुधारली. व यानंतर सर्व विद्यार्थ्यांना स्वतःचं नाव मराठी व इंग्रजी मध्ये सुद्धा लिहिता यायला लागले.  त्याच प्रमाणे ३० पर्यंत विद्यार्थ्यांचे पाढे अतिशय छान पद्धतीने पाठ झाले. ५ ते ६ अंकी संख्या त्यांना वाचता यायला लागल्या.स्थानिक किमती सांगता यायला लागल्या. विस्तारित रूप लिहिता यायला लागले. या पद्धतीने घरोघरी शाळा या अभिनव नवोपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांची गुणवत्ता अतिशय छान पद्धतीने वाढली.त्याचा अनुभव प्रत्यक्ष सर्व पालकांच्या दृष्टीस दिसून आला.

**b. अध्ययन अध्यापनात मनोरंजकता:-**

सर्व विद्यार्थ्यांना अतिशय प्रेमाने व मायेने जवळ घेऊन त्यांना कोणत्या प्रकारे अभ्यास करायला आवडेल या पद्धतीने त्यांना विचारून व अध्ययन अध्यापन अधिकाधिक मनोरंजक कसे होईल याचा विचार करून सर्व विद्यार्थ्यांच्या घरामध्ये शाळा तयार करून दिली. अध्ययन अध्यापन करत असताना विद्यार्थी हसत खेळत आणि आनंददायी वातावरणात कसा अभ्यास करेल याकडे जास्तीत जास्त लक्ष देऊन त्या प्रमाणे सर्व शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले. अध्ययन अध्यापनात मनोरंजकता येण्यासाठी घरातील सर्व सदस्यांची मदत घेऊन त्यांना अध्ययन करण्यास  प्रवृत्त केले. कारण आपल्या शिक्षकांबरोबरच आपल्या घरातील सर्व सदस्य आपल्या सोबत अभ्यास करणार व आपल्या सोबत बसणार आहेत याचा विचार करून विद्यार्थी अभ्यासाचा आनंद घेत होते. आणि या सर्व सदस्यांच्या मदतीने विद्यार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत मनोरंजकता निर्माण झाली.

**c. स्वयंअध्ययनाची सवय :-**

सर्व शिक्षक व पालकांच्या मदतीने घरोघरी शाळा तयार झाल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनची सवय लागली. कारण आई वडील कामावर गेल्यानंतर विद्यार्थी यांच्या सतत नजरेसमोर शाळा असल्यामुळे ते स्वतः अभ्यास करू लागले, व घरातील आज्जी-आजोबांना सुद्धा शिकवू लागले. यातून प्रौढ साक्षरता सुद्धा साध्य झाली.

**d. शिक्षण प्रवाहात गुंतवून ठेवणे :-**

कोरोना महामारी च्या काळामध्ये सर्व विद्यार्थी हे शाळेपासून दूर गेले होते, परंतु घरोघरी शाळा या नवोपक्रमाद्वारे त्यांच्या घरातच शाळा तयार झाल्यामुळे सर्व विद्यार्थी हे अखंडपणे अध्ययन अध्ययन प्रक्रियेत गुंतून राहिले. शिक्षण प्रवाहात गुंतून राहिले. कारण सतत नजरेसमोर शैक्षणिक साहित्य असल्यामुळे  शैक्षणिक साहित्य त्यांना अध्ययन करण्यास प्रवृत्त करू लागले. आणि यातूनच सर्व विद्यार्थी शिक्षण घेऊ लागले कारण घराच्या आत व घराच्या बाहेर खेळायला गेल्यानंतरसुद्धा

विद्यार्थ्यांना नजरेसमोर सतत अध्ययन साहित्य असल्यामुळे ते अखंडपणे शिक्षण प्रवाहात गुंतून राहिले.

**e. सुरक्षित वातावरणात शिक्षण देणे :-**

संपूर्ण जगात पसरलेल्या या नैसर्गिक कोरोना महामारी वर मात करून सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्याच घरात सुरक्षित ठेवून अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत गुंतवून ठेवण्यात मला यश आले. कारण बाहेर गेल्यानंतर कोरोनाची भीती होती, त्यामुळे शाळाही बंद होत्या आणि अशा पद्धतीने सर्व विद्यार्थी स्वतःच्या घरातच राहून शिक्षक व घरातील सर्व सदस्यांच्या मदतीने सुरक्षित रित्या अभ्यास करू लागले.

Covid-19 या आजाराने संपूर्ण जगात धुमाकूळ घातला व त्यामुळे शिक्षण ही त्यापासून वाचू शकलेले नाही. माझ्या शाळेतील च नव्हे तर संपूर्ण विद्यार्थ्यांना शिक्षणाला मुकावे लागणार, ही समस्या मला स्वस्थ बसू देत नव्हती. शाळा नसताना सर्व विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू ठेवणे गरजेचे बनले होते, या सर्व बाबींसाठी केवळ घरोघरी शाळा हा रामबाण उपाय म्हणून माझ्यासमोर होता.

विद्यार्थ्यांना शाळा बंद परंतु शिक्षण सुरू ठेवण्यासाठी सर्वच माध्यमातून प्रयत्न सुरू झाले होते. यात ऑनलाइन वर्ग, झूम, गुगल मीट, स्कायपी,इत्यादि साधने वापरली जाऊ लागली, परंतु हे सर्व ग्रामीण भागात सहज शक्य नसल्याने घरोघरी शाळा हा नवोपक्रम मी राबवण्यास सुरुवात केली.

यात प्रत्येक विद्यार्थ्याच्या घरातच त्याची शाळा बनवली. मी जून 2019 पासून प्रत्येक विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांची स्वतंत्र शाळा तयार करण्यास प्रारंभ केला. सर्व विद्यार्थ्यांना उपयुक्त होईल असे दर्जेदार शैक्षणिक साहित्य निर्माण करून त्यांना घरातच अध्ययनास प्राप्त करून दिले.

त्यामुळे झाले असे की, शिक्षकांच्या सहकार्याने व पालकांच्या मदतीने विद्यार्थी हसत-खेळत व आनंददायी वातावरणात अध्ययन करू लागले. घरातील मोठी माणसे सुद्धा घरातच शाळा अवतरल्याने कधीही त्यांच्या वेळेप्रमाणे त्यांच्या मुलांचा अभ्यास घेऊ लागली. यातून प्रौढ साक्षरता सुद्धा घडून आली. घरातील आज्जी- आजोबा सुद्धा अभ्यास करू लागली व नातवंडांना शिकवू लागली.

शिक्षणाची ज्ञानगंगा सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम मी या घरोघरी शाळा नवोपक्रमाद्वारे मी साध्य करू शकले.

# नवोपक्रमाची उद्दिष्टे

1)100 % टक्के विद्यार्थ्यापर्यंत शिक्षण पोहोचण्यासाठी प्रत्यक्ष गृह भेटीद्वारे ऑफलाइन शिक्षण देणे.

2 ) प्रत्येक विद्यार्थ्यांच्या घरी स्वतंत्र शाळा निर्माण करून विद्यार्थ्यांचे शिक्षण अखंडितपणे सुरू ठेवणे.

3 ) गृहभेटी द्वारे विद्यार्थ्याला अध्यापन करण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या पालकाला विद्यार्थ्यांचा अभ्यास कसा घ्यावा याचे मार्गदर्शन करून पालकाचा अध्ययन अध्यापनामध्ये सहभाग घेणे.

4) अध्यापन केलेल्या घटकाचा पालकांच्या मदतीने सराव होण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यास स्वतंत्र शैक्षणिक साहित्याचा संच देणे.

5 ) विद्यार्थ्यांचे अध्यापन सहजपणे व आनंददायी होण्यासाठी घर व परिसरात विविध शैक्षणिक तक्ते निर्माण करणे.

# नवोपक्रमाचे नियोजन

## A. उपक्रम पूर्वस्थिती चे निरीक्षण

१. जूनमध्ये शाळा उघडल्यानंतर मुलांची अध्ययन पातळी अतिशय खालावलेली होती.

२.पहिलीच्या मुलांनी तर अजून शाळेत पाऊल न टाकताच ते पुढच्या वर्गात गेले होते त्यामुळे त्यांना अक्षर ओळख नव्हती.

३.सर्व विद्यार्थी अध्ययन अध्यापन प्रक्रियेपासून कोरोना काळात वंचित राहिल्याने परिस्थिती अवघड झालेली होती.

४.सर्व पालकांची इच्छा व माझी तळमळ अशी की,सर्व विद्यार्थी गुणवत्तेत सुधारले पाहिजे पुढे आले पाहिजे.

५.विद्यार्थ्यांना स्वतःचे नाव लिहिता येत नव्हते,पाढे पाठांतर नव्हते.गणिती क्रिया विसरले होते.

६.विद्यार्थ्यांना अध्ययन अध्यापन उपयुक्त शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे महत्वाचे ठरणार होते, व ते हि आनंददायी वातावरणात करून देणारे असावेत.

## B संबंधित व्यक्तींशी/तज्ज्ञांशी चर्चा

घरोघरी शाळा या नवोपक्रम संदर्भात आमच्या लाडगाव केंद्राचे केंद्रप्रमुख **ठाकरे साहेब** व आमच्या वैजापुर तालुक्याचे सन्माननीय गटशिक्षणाधिकारी **श्री दिवेकर साहेब** यांच्याशी चर्चा केली .त्यांनीही वेळोवेळी मोलाचे व महत्त्वाचे मार्गदर्शन केले.

त्याचप्रमाणे आमच्या वैजापुर तालुक्याचे संपर्क अधिकारी डायट चे ज्येष्ठ अधिव्याख्याता **डॉ. श्री रवी जाधव सर** यांचेही मोलाचे व महत्त्वपूर्ण असे मार्गदर्शन मिळाले.

सातारा जिल्ह्यातील वडगाव शाळेचे मुख्याध्यापक **खरात सर** की ज्यांची घरोघरी शाळा ही संकल्पना आहे यांचेही मोलाचे मार्गदर्शन मिळाले. पंचायत समिती वैजापूर चे विषय तज्ञ **श्री. रमेश बागुल सर**, मोबाईल टीचर **श्री.मरेवार सर** या सर्वांच्या मार्गदर्शनामुळे **घरोघरी शाळा** साकार करण्यास मदत झाली.

अशा पद्धतीने वरील सर्व तज्ञांच्या मार्गदर्शनामुळे व चर्चेद्वारे या नवोपक्रमात ज्ञानरचना वादावर आधारित शाळा निर्मितीसाठी योग्य दिशा मिळाली.

**C - आवश्यक साधनांचा विचार**

कोरोना काळात घरोघरी शाळा तयार करण्यासाठी बरेच साहित्य आवश्यक होते, ते खालील प्रमाणे.......

१. सर्व विद्यार्थ्यांच्या घरी तक्ते लावण्यासाठी कार्डशिट

२. तर ते लेखन करण्यासाठी मार्कर, स्केचपेन.

३. शैक्षणिक पेंटिंग करण्यासाठी ऑइल पेंट चे सर्व रंग, ब्रश, रंगकाम साहित्य.

४. इयत्तेनुसार अध्ययन घटकांचे झेरॉक्स काढणे.

५. शैक्षणिक साहित्य स्वनिर्मित तयार करून ठेवण्यासाठी विविध आकारांच्या टोपल्या.

६. इयत्ता पहिली ते चौथी साठी उपयोगात येणारे सर्व शैक्षणिक साहित्य तयार करून ते भिंतीवर लावण्यासाठी चिकट काम साहित्य इत्यादी.

**D- करावयाच्या कृतीचा क्रम :-**

- **पूर्व चाचणी**
- **पालक प्रतिक्रिया**
- **शैक्षणिक साहित्य निर्मिती**
- **शैक्षणिक पेंटिंग**
- **घरोघरी शाळा**
- **घरच अभ्यास केंद्र**
- **पालक प्रतिक्रिया**
- **उत्तर चाचणी**

सर्वप्रथम सर्व विद्यार्थ्यांची पूर्व चाचणी घेतली त्या चाचणीतील गुणांनुसार सर्व विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर निश्चित करण्यात आला .प्रत्येक विद्यार्थ्याला त्यांच्या अध्ययन पातळीप्रमाणे कोणकोणते शैक्षणिक साहित्य त्यांना गरजेचे आहे, त्याप्रमाणे स्वनिर्मित शैक्षणिक साहित्य बनवण्यास सुरुवात केली.व यानंतर तयार झालेले सर्व शैक्षणिक साहित्य त्यांच्या घरात लावण्यात आले.काही साहित्य विविध आकारांच्या टोपल्यात ठेवण्यात आले. काही उपयुक्त शैक्षणिक पेंटिंग विद्यार्थ्यांच्या घरातील भिंती, पडवीत,शेडच्या खांबावर,पाण्याच्या टाक्या,शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या पाईपवर, तुळशीवर,बैठकीच्या ठिकाणी इत्यादी इयत्तेनुसार उपयुक्त असे सर्व शैक्षणिक पेंटिंग स्वतः केली.

इयत्तेनुसार उपयुक्त असे सर्व शैक्षणिक साहित्य त्यांच्या घरी लावून घरालाच शाळेचे स्वरूप दिले. अशा प्रकारे सर्व विद्यार्थ्यांच्या घरात ज्याची त्याची स्वतंत्र शाळा तयार करून दिली.

**E-उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण**

घरोघरी शाळा हा उपक्रम राबवल्या नंतर सर्व विद्यार्थी यांच्या घरी जाऊन गृहभेटी अंतर्गत विद्यार्थ्यांचा अभ्यास तपासू लागले.व पुढचा अभ्यास ही देउ लागले. सर्व अध्ययन घटक डोळयासमोर असल्याने विद्यार्थी आनंददायी वातावरणात अभ्यास करू लागली.

या नवोपक्रमाचा सर्वात जास्त फायदा असा झाला की, विद्यार्थी त्यांच्या त्यांच्या अध्ययन क्षमतेप्रमाणे कधीही व कोणत्याही वेळी अभ्यास करू लागले. पालकांचे सहकार्य खूप मिळाले. पालकांनीसुद्धा मुलांचा अभ्यास घेण्यास सुरुवात केली. कारण घरातच शाळा तयार झाल्याने पालकांना त्यांच्या मुलांचा अभ्यास घेण्यास वेळ मिळू लागला.

घरोघरी शाळा या नवोपक्रमाने विद्यार्थ्यांना अपेक्षित अध्ययन निष्पत्ती प्राप्त झाल्या. उत्तर चाचणीत विद्यार्थ्यांमधील झालेल्या सकारात्मक बदल दिसून आला.

**F-कार्यवाहीचे टप्पे**

घरोघरी शाळा हा नवोपक्रम मुळातच पालकांच्या सहकार्याने करायचा असल्याने त्यांची परवानगी घेणे महत्त्वाचे होते. यात विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधारणार असल्याने सर्व पालक त्यासाठी तयार होते.

१. जून 2021 मध्ये सर्व पालकांची ग्रुहभेट घेऊन त्यांची परवानगी मिळवली,कारण यात त्यांच्या घरात शाळा तयार करायची होती.

२. यानंतर सर्व विद्यार्थ्यांसाठी घरात शाळा तयार करण्यासाठी त्याच्या इयत्तेनुसार शैक्षणिक साहित्य निर्मिती केली. यात तक्ते लिहिणे, टोपल्यांत मुळाक्षरे ठेवने, संख्या कार्ड बनवणे, शब्द पट्ट्या तयार करणे, पेंटिंग करणे इत्यादी.

३. त्याचप्रमाणे पालकांच्या संपर्कात राहून अध्ययन साहित्य यादी करून ती त्यांच्या घरात भिंतीवर लावण्यात आली.

४. काही उपयुक्त तक्ते जे सर्व मुलांना समान अध्ययनासाठी लागतील ते सर्व मुलांच्या घरी लावली.

५. अशाप्रकारे जून 2021 ते ऑक्टोबर 2021 पर्यंत सर्व इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांच्या घरात ज्याची त्याची स्वतंत्र शाळा तयार केली.

६. घरोघरी शाळा बनवलेल्या पैकी जी पहिली शाळा बनवली, त्याचे उद्घाटन वैजापूर तालुक्याचे सन्माननीय गटशिक्षणाधिकारी श्री. मनीष दिवेकर साहेब यांच्या हस्ते पार पाडले.त्याचप्रमाणे

वैजापुर तालुक्याचे प्राध्यापक आमदार श्री रमेश बोरणारे साहेब यांनी सदिच्छा भेट देऊन समाधान व्यक्त केले.

७. घरोघरी शाळा या नवोपक्रमांतर्गत भेट देणारे अधिकारी व शिक्षक आणि विद्यार्थ्यांची अध्ययन पातळी तपासून समाधान व्यक्त केले.

## G-उपक्रमासाठी इतरांची मदत

या उपक्रमासाठी सर्वात जास्त मदत लागणार होती ती विद्यार्थ्यांच्या पालकांची व ती मला खूप मिळाली. त्याच प्रमाणे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य, मुख्याध्यापक, ग्रामस्थ यांचीही मोलाची मदत मिळाली

नवोपक्रम प्रसिद्धीसाठी न्यूज चॅनेल ची मदत झाली. तसेच वर्तमानपत्राद्वारे घरोघरी शाळा हा नवोपक्रम प्रसिद्ध होऊन इतरांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली.

## कार्यवाहीचे वेळापत्रक

| अ.क्र. | इयत्ता | महिना | उपक्रम |
|---|---|---|---|
| १ | १ ली ते ४ थी | १५/०६/२०२१ ते २०/०६/२०२१ | पूर्व चाचणी |
| २ | १ ली ते ४ थी | २१/०६/२०२१ ते ३०/०६/२०२१ | सर्व इयत्तांसाठी शैक्षणिक साहित्य निर्मिती |
| ३ | १ ली | ०१/०७/२०२१ ते १०/०७/२०२१ | विद्यार्थ्यांच्या घरी शैक्षणिक साहित्य लावणे व अध्ययन अध्यापन करणे |
| ४ | २ री | ११/०७/२०२१ ते २०/०७/२०२१ | विद्यार्थ्यांच्या घरी शैक्षणिक साहित्य लावणे व अध्ययन अध्यापन करणे |
| ५ | १ ली ते ४ थी | २१/०७/२०२१ ते ३१/०७/२०२१ | विद्यार्थ्यांच्या घरी शैक्षणिक पेंटिंग करणे व अध्ययन अध्यापन करणे |
| ६ | ३ री | ०१/०८/२०२१ ते १५/०८/२०२१ | विद्यार्थ्यांच्या घरी शैक्षणिक साहित्य लावणे व अध्ययन अध्यापन करणे |
| ७ | ४ थी | १६/०८/२०२१ ते ३१/०८/२०२१ | विद्यार्थ्यांच्या घरी शैक्षणिक साहित्य लावणे व अध्ययन अध्यापन करणे |
| ८ | १ ली | ०१/०९/२०२१ ते १०/०९/२०२१ | विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन प्रत्यक्ष अध्ययन अध्यापन करणे |
| ९ | २ री | ११/०९/२०२१ ते २०/०९/२०२१ | विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन प्रत्यक्ष अध्ययन अध्यापन करणे |
| १० | ३ री | २१/०९/२०२१ ते ३०/०९/२०२१ | विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन प्रत्यक्ष अध्ययन अध्यापन करणे |
| ११ | ४ थी | ०१/१०/२०२१ ते १५/१०/२०२१ | विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन प्रत्यक्ष अध्ययन अध्यापन करणे |
| १२ | १ ली ते ४ थी | १६/१०/२०२१ ते २१/१०/२०२१ | उत्तर चाचणी |

# नवोपक्रमाचे पुरावे







**घरा सभोवताली शैक्षणिक पेंटिंग करतांना**







- विद्यार्थ्यांच्या घरोघरी शैक्षणिक साहित्य लावतांना





**घरोघरी जाऊन अध्ययन अध्यापन करतांना**

# नवोपक्रमाची कार्यपद्धती

**१.पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी:-**



**सदर नवोपक्रमाच्या सुरवातीला प्रत्येक विद्यार्थ्याचा अध्ययन स्तर निश्चित करण्यात आला.**

कोरोणा काळात शिक्षक व विद्यार्थी संपर्क फक्त मोबाईल व्हाट्सअप समूह तथा फोन द्वारे संपर्क इतक्याच प्रमाणात होता. परंतु ज्यांच्या कडे मोबाईलच नाही अशांसाठी काय? त्यामुळे अशा परिस्थितीत सर्वोत्तम अध्ययन अनुभव त्यांच्यापर्यंत उपलब्ध होण्यासाठी घरोघरी शाळा या उपक्रमाची निवड केली.

विद्यार्थ्यांची अध्ययन पातळी लक्षात घेता जे जे उपयोगी पडेल असे साहित्य तयार करणे गरजेचे होते. त्यामुळेच पालकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधारण्यासाठी हा नवा उपक्रम सुरू केला. पूर्वस्थितीत सर्व विद्यार्थी फक्त खेळ याकडेच आकर्षित होते, परंतु या नवोपक्रमाद्वारे सर्व विद्यार्थी हसत-खेळत आनंददायी वातावरणात अध्ययन करणार होते. इयत्ता पहिली ते चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांच्या घरी शाळा तयार करण्यासाठी त्यांच्या घरातील एका खोलीची निवड करून त्याची नोंद घेण्यात आली.

पूर्वचाचणी व उत्तर चाचणीच्या नोंद ठेवण्यात आल्या.

## २.कार्यवाही दरम्यान निरीक्षणे व माहिती संकलन



**विद्यार्थ्यांना त्यांच्या घरातील शाळेतच अध्ययन अनुभव**


सर्व विद्यार्थ्यांच्या घरातच ज्याची त्याची स्वतंत्र शाळा तयार करून दिल्यानंतर त्यांना कोरोना काळात शाळा बंद असतानाही शिक्षण प्राप्त होण्यात गुंतून राहिल्याने पालक वर्ग सुद्धा आनंद झाला.

प्रत्येक विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन तयार केलेल्या शाळेतच गृहभेटी द्वारे अभ्यास देऊ लागले. व विद्यार्थ्यांना त्यांच्या घरातील शाळेतच अध्ययन अनुभव देऊ लागले.

## ३.उपक्रम पूर्ण झाल्यावर निरीक्षणे व त्याच्या नोंदी

सर्व विद्यार्थ्यांच्या घरातच ज्याची त्याची स्वतंत्र शाळा तयार करून दिल्यानंतर त्यांना कोरोणा काळातही शाळा बंद असतांना घरातच राहून सुरक्षितरित्या शिक्षण घेण्यास मदत झाली. विद्यार्थी अभ्यासात गुंतून राहिल्याने पालक वर्गातही समाधान व्यक्त होताना दिसून आले.

नवोपक्रम पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्यांच्या घरी एक दिवस या प्रमाणे त्यांचा अभ्यास तपासून पुढील अभ्यास देऊ लागले. त्यामुळे संबंधित विद्यार्थी त्यांच्या घरातील शाळेत गुंतून राहून अध्ययन करू लागले.या उपक्रमाबद्दल सर्व पालकांचा दृष्टिकोन सकारात्मक बनला.




### ४. कार्यवाहीत आलेल्या अडचणी

नक्कीच हा उपक्रम राबवताना मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागले.कोरोणा मुळे सर्व विद्यार्थ्यांपर्यंत कसे पोहोचायचे?ही सर्वात मोठी अडचण होती.कारण आपण तब्येतीने चांगले आहोत का? याची पालकांना खात्री द्यावी लागली. कारण घरातून बाहेर पडली तर सगळीकडे कोरोनाची भीती होती, व माझ्या मनात माझे विद्यार्थी शिक्षणापासून दुरावणार तर नाही ना ही भीती होती.

परंतु विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठीची जी माझी तळमळ होती, ती मला या सर्व समस्यांवर मात करून त्यांच्या पर्यंत घेऊन गेली. इच्छा असेल तर मार्ग मिळतोच. विद्यार्थ्यांच्या समस्या माझ्यापरीने दूर करून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे मार्ग मला मिळत गेले व घरोघरी शाळा हा अभिनव नवोपक्रम साकार झाला.

### ५. माहितीचे विश्लेषण

ऑनलाइन शिक्षण हे जरी कोरोणा काळात प्रभावी वाटत असले तरी ग्रामीण भागात मात्र त्यात विषमता दिसून येते.म्हणून विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण जलद पोहोचण्यासाठी कोरोणा काळात घरोघरी शाळा हा नवोपक्रम मला खूप उपयुक्त ठरला.याचाच करून जून 2021 ते ऑक्टोबर 2021 पर्यंत मी स्वतः माझ्या शाळेत राबवलेले उपक्रम सर्व विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरलेला आहे.

एक असा प्रयत्न जो की, शिक्षणासाठी पूरक ठरत असलेल्या अंधारलेल्या दिशेमध्ये ज्ञानरूपी प्रकाश मिळावा असा, शिक्षक व विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवणारा नवोपक्रम ठरला. घरोघरी शाळा यांना उपक्रमात विद्यार्थ्यांची पूर्वचाचणी व उत्तर चाचणी घेण्यात आली. प्रथम जून 2021या महिन्यात सर्व विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांची पूर्वचाचणी घेण्यात आली. त्याप्रमाणे प्रत्येक विद्यार्थी कोणत्या अध्ययन स्तरात आहे, याची नोंद ठेवण्यात आली. त्याप्रमाणे उद्दिष्टे तयार करून ते साध्य करण्याकरिता सर्व विद्यार्थ्यांच्या घरी घरोघरी शाळा निर्माण करून व सगळयात शेवटी ऑक्टोबर 2021या महिन्यात उत्तर चाचणी घेण्यात आली. अगदी सुरुवातीची पूर्वचाचणी व चार महिन्यानंतर ची उत्तर चाचणी घेतली यामध्ये खूप मोठा फरक दिसून आला. शाळा बंद पण शिक्षण चालू या उपक्रम अंतर्गत सर्व विद्यार्थी हे शिक्षण प्रवाहात येत नव्हते,त्यासाठी हा नवोपक्रम राबवला,व त्यांनतर ९४ टक्के विद्यार्थी हे अध्ययन अध्यापन प्रक्रियेत आले .

त्याचा तुलनात्मक वृत्तालेख खालीलप्रमाणे,

**नवोपक्रम पूर्वस्थिती व उत्तरस्थिती:-**

नवोपक्रम चालू करण्यापूर्वी

अध्ययन अध्यापन प्रक्रियेत विद्यार्थी संख्या फक्त 14 च होती,,,,परंतु घरोघरी शाळा हा नवोपक्रम चालू केल्यानंतर विद्यार्थी संख्या हि 37 झाली.


एकूण 39 पटापैकी 37 विद्यार्थी हे अध्ययन अध्यापन प्रक्रियेत सहभागी झाले.स्वनिर्मित शैक्षणिक साहित्याद्वारे व घरातील सदस्यांच्या मदतीने विद्यार्थी स्वयंअध्ययन करू लागले.

अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील विद्यार्थी संख्या पूर्वीपेक्षा खूप चांगल्या प्रमाणात वाढली.याप्रमाणे विद्यार्थी कोरोना काळातही त्यांच्या च घरात राहून सुरक्षितरित्या अभ्यास करू लागले.

## उपक्रमापुर्वी शिक्षण प्रवाहात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या

| अ.क्र. | इयत्ता | एकूण विद्यार्थी संख्या | अध्ययन प्रक्रियेत सहभागी विद्यार्थी | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | १ ली | १५ | ०५ | १३ % |
| २ | २ री | ०४ | ०१ | ०३ % |
| ३ | ३ री | ०८ | ०४ | १० % |
| ४ | ४ थी | १२ | ०४ | १० % |
| ५ | वंचित विद्यार्थी | २५ | - | ६४ % |
| | एकूण विद्यार्थी संख्या | ३९ | १४ | १०० % |


उपक्रमापुर्वी शिक्षण प्रवाहात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या



## उपक्रम राबिवल्या नंतरअध्ययन प्रक्रियेत सहभागी विद्यार्थ्यांची संख्या

| अ.क्र. | इयत्ता | एकूण विद्यार्थी संख्या | अध्ययन प्रक्रियेत सहभागी विद्यार्थी | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | १ ली | १५ | १४ | ३६ % |
| २ | २ री | ०४ | ०४ | १० % |
| ३ | ३ री | ०८ | ०८ | २० % |
| ४ | ४ थी | १२ | ११ | २८ % |
| ५ | वंचित विद्यार्थी | २ | - | ६ % |
| | एकूण विद्यार्थी संख्या | ३९ | ३७ | १०० % |

**उपक्रम राबिवल्या नंतर शिक्षण प्रवाहात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या**




**तुलनात्मक वृत्तालेख**

# नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पत्ती

जेव्हा एक समस्या तुम्हाला उद्दिष्टापर्यंत आणते तेव्हा तुम्ही आपोआपच त्या समस्येचे उपायांचा शोध घेत घेत यशाकडे निश्चितच वाटचाल करू लागता

1. कोरोणा काळात शाळा बंद असल्याने विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन करण्याकरिता सर्व प्रकारचे शैक्षणिक साहित्य त्यानुसार उपलब्ध करून देता आले. त्यामुळे पालकांना आता शाळा बंद आहे असे कोरोणा काळात वाटलेच नाही.या नवोपक्रमाचा यात खूप उपयोग झाला.
2. घरालाच शाळेचे स्वरुप आल्याने व मॅडम सुद्धा घरी येतात त्यामुळे विद्यार्थी,पालक व शिक्षक यांच्या मदतीने शैक्षणिक साहित्य द्वारे विद्यार्थी आवडीने अध्ययन करू लागले.
3. विद्यार्थ्यांत अभ्यासाची आवड निर्माण झाली. पालक सुद्धा हवे तेव्हा त्यांच्या मुलांचा अभ्यास घेऊ लागली.
4. विद्यार्थ्यांची वाचनाची व लेखनाची गती पूर्वीपेक्षा खूपच चांगल्या प्रमाणात सुधारली.
5. इंग्रजीचे मुळाक्षरे, बाराखडी वाचता येऊ लागली, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या बोलण्यात आत्मविश्वास वाढला.
6. विद्यार्थी हसत खेळत तणाव मुक्त वातावरणात आवडीने हवे तेव्हा हव्या त्या वेळी अभ्यास करू लागली.
7. घरातील प्रौढ साक्षरता सुधारली. आज्जी आजोबाही नातवंडाचा अभ्यास घेऊ लागली. व स्वतःही करू लागली.
8. सर्व गणितीय मूलभूत क्रियांचा बोध सहज साध्य झाला.
9. विद्यार्थ्यांना घरातच सुरक्षित राहून शिक्षण घेता आले त्यामुळे पालक- शिक्षक यांच्या सु संबंध सहकार्य वाढले.
10. शाळा बंद असताना शिक्षण सुरू राहण्यात एकंदरीत घरोघरी शाळा सर्व विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत जाऊन व त्यांना अध्ययन प्रवाहात टिकवून ठेवण्यात त्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाला चालना देण्याचा या उपक्रमाद्वारे केलेला एक छोटासा प्रयत्न सर्व विद्यार्थ्यांना ज्ञानाची शिदोरी देऊन गेला.

## घरोघरी शाळा या अभिनव नावोपक्रमाची वर्तमानपत्रे व राज्यमासिकांनी घेतलेली दखल :-

**लोकमत**

# वैजापूर तालुक्यात 'घरोघरी शाळा' उपक्रमाला प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**वैजापूर :** ऑनलाईन शिक्षणात येणाऱ्या अडचणी सोडवून शिक्षणाची ज्ञानगंगा सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी घरोघरी शाळा उपक्रम सुरू आहे. तालुक्यातील लेंभे डोखे वस्तीवर उपक्रमशील शिक्षिका शर्मिला विधाटे यांनी इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी पुढाकार घेतला आहे. या अभिनव उपक्रमाचे उद्घाटन गटशिक्षण अधिकारी मनीष दिवेकर यांच्या हस्ते करण्यात आले.



घरोघरी शाळा या उपक्रमास उपस्थित शिक्षकांसह विद्यार्थी व पालक.

यावेळी केंद्रप्रमुख नामदेव ठाकरे, विषयतज्ज्ञ रमेश बागुल, डोणगावचे सरपंच स्वाती धोर्डे, उपसरपंच सुनीता लेंभे, रवींद्र धोर्डे, बि. यु. जगताप, अण्णा सोनवणे, अमोल गमे, अमोल धायतडक आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी व पालकांनी घरासमोर रांगोळी काढल्या होत्या. विद्यार्थ्यांच्या घरात विविध तक्ते लावण्यात आले आहे. शाळेपासून दूर असलेल्या चिमुकल्यांना परिसरात शाळा अवतरल्याने विद्यार्थ्यांचा चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता.

Hello Aurangabad Gramin
Page No. 4 Aug 27, 2021
Powered by: erelego.com

**लोकमंथन**

# डोणगावच्या लेंभे व डोखे वस्ती येथे घरोघरी शाळा उपक्रम

**पुणतांबा/प्रतिनिधी :** वैजापूर तालूक्यातील डोणगाव येथील लेंभे व डोखे वस्ती येथे घरोघरी शाळा या उपक्रमांतर्गत इयत्ता १ ली ते ४ थी च्या एकूण ५ विद्यार्थी गटासाठी घरातच तयार करण्यात आलेल्या स्वतंत्र शाळेची सुरुवात इयत्ता चौथीच्या रूद्र गजेंद्र लेंभे याच्या घरात शाळा सुरू करण्यात आली.

उपक्रमशील शिक्षिका शर्मिला विधाटे याचे या उपक्रमाबद्दल कौतुक करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढी साठी शिक्षकानी याच पद्धातीने उपक्रम राबविले पाहिज असे वैजापूर पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी मनीष दिवेकर यांनी स्पष्ट केले. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे शाळा बंद असल्याने शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांचे शिक्षण प्रभावीपणे सुरू राहण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लेंभे व डोखेवस्ती शाळेच्या सहशिक्षिका शर्मिला विधाटे यांनी घरोघरी शाळा हा अभिनव उपक्रम राबविला आहे या उपक्रमांतर्गत प्रत्येक विद्यार्थ्यास शैक्षणिक साहित्याचा संच विनामूल्य देऊन या उपक्रमामध्ये समाविष्ट विषय गोष्टीचे पुस्तक वाचन, शब्द वाचन तक्ते वाचन ,गणित, इंग्रजी व मराठी पेटी साहित्य पाठांतरावर भर दिला जात आहे. असे उपक्रमशिल सहशिक्षिका शर्मिला विधाटे यांनी स्पष्ट केले. यावेळी गटशिक्षणाधिकारी मनीष दिवेकर विषयतज्ञ बागुल, लाडगाव केंद्राचे केंद्रप्रमुख ठाकरे, सोनवणे, धायतडक उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक कल्पना खांदे यांनी केले सूत्रसंचालन अमोल गमे तर शर्मिला विधाटे यांनी आभार मानले.

Ahmednagar Edition
Aug 30, 2021 Page No. 2
Powered by : eReleGo.com

Title Code No.MAHMAR 34

दैनिक प्रतिवीर

Email ID : newsprativeer@gmail.com

सोलापूर/कोल्हापूर/औरंगाबाद/उस्मानाबाद/नांदेड/लातूर/बीड/अहमदनग

बाद,बीड,लातूर,नांदेड,अहमदननगर गुरुवार, दि. २६ ऑगस्ट २०२१ मराठी दैनिक प्रतिवीर वर्ष २ रे अंक : ४ पाने

# वैजापूर तालुक्यात घरोघरी शाळा उपक्रमाचे उदघाटन

**वैजापूर/प्रतिनिधी**

ऑनलाईन शिक्षणात येणाचा विविध अडचणी व कोरोना महामारी संकटावर व विविध अडचणींवर मात करून शिक्षणासाठी ज्ञानगंगा सर्व विद्यार्थ्यांपर्यंत होचण्यासाठी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लेंभे डोखे वस्ती येथील उपक्रमशील शिक्षिका श्रीमती.शर्मिला अशोक विधाटे मॅडम यांनी इयत्ता पहिली ते चौथी च्या विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या घरोघरी शाळा या अभिनव उपक्रमाचे उदघाटन वैजापूर तालुक्याचे सन्म ानीय गटशिक्षण अधिकारी श्री. मनीष दिवेकर साहेब यांच्या शुभहस्ते तसेच लाडगाव केंद्राचे केंद्र प्रमुख सन्माननीय



श्री. नामदेव ठाकरे सर, विषयतज्ञ श्री. रमेश बागुल सर, डोणगावच्या सरपंच सौ. स्वाती रवींद्र धोर्डे, श्री. रवींद्र धोर्डे , उपसरपंच सौ. सुनीता युवराज लेंभे, व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात व आनंदमय वातावरणात पार पडला.

सातारा जिल्ह्याच्या माण तालुक्यातील जि. प.प्रथा.शाळा वडगावचे मुख्याध्यापक श्री. संजय खरात यांची संकल्पनेतून घरोघरी शाळा उपक्रम वैजापूर शिक्षक संघ महिला अघाडीच्या पदाधिकारी श्रीम ती. शर्मिला अशोक विधाटे यांनी लेंभे डोखे वस्ती डोणगाव मध्ये राबवण्यास सुरुवात केली. १००% विद्यार्थ्यांचे शिक्षण प्रभावीपणे सुरू ठेवण्यासाठी इयत्ता १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या शाळांपैकी रुद्र गजेंद्र लेंभे इ. ४थी या विद्यार्थ्यांच्या घरी सदर उदघाटन सोहळा पार पडला. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या घरासमोर आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती. विद्यार्थ्यांच्या घरामध्ये विविध तक्ते लावण्याबरोबर यांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. म ान्यवरांचे आगमन होताच रुद्र लेंभे या विद्यार्थ्यांनी सर्वांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले श्री. अमोल गमे सर यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. श्रीमती. कल्पना खांदे मॅडम मुख्याध्यापक लेंभे डोखे वस्ती शाळा यांनी प्रास्ताविक केले. कोरोना संकटामुळे सुमारे दीड वर्षे शाळा बंद असल्याने शाळेपासून दूर असलेल्या चिमुकल्याच्या प्रत्यक्ष घरात शाळा अवतरल्यामुळे रुद्र लेंभे खूष झाला. त्याने मान्यवरांनी विचारलेल्या प्रश्नांची अचूक उत्तरे देवून त्यांची मने जिंकली.

याप्रसंगी उपस्थित सर्व म ान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना उपक्रमाचे कौतुक केले. सदर उपक्रमाची माहिती सांगिताना श्रीमती शर्मिला विधाटे म्हणाल्या की, मा. संजय खरात यांच्या संकल्पनेतून निम ाण झालेल्या या उपक्रमामुळे एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही. सर्व विद्यार्थ्यांना तणावमुक्त वातावरणामध्ये आनंददायी पद्धतीने शिक्षण मिळेल.मान्यवरांनी व उपस्थित पालक वर्गाने श्रीमती शर्मिला विधाटे यांचे उपक्रम राबवल्याबद्दल विशेष कौतुक केले व अभिनव उपक्रमाच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## जिव्हेश्वर मुर्तीची वैजापुरात स्थापना

**वैजापूर/प्रतिनिधी**

येथील स्टेट बँक रस्त्यावरील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात वेदमूर्ती भगवान श्री जिव्हेश्र्वर यांच्या जन्मोत्सवानिमित्त भगवान जिव्हेश्वर मूर्तीची नुकतीच प्राणप्रतिष्ठा करण्यात आली या कार्यक्रमाला आमदार प्रा. रमेश बोरनारे, नगराध्यक्ष शिल्पा परदेशी व माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी यांची प्रमुख उपस्थिती होती त्यांच्या हस्ते मूर्तीचे विधिवत पूजन करण्यात आले. सोहळ्यानिमित्त तीन दिवस मंत्रोचारात पुजा पाठ, होमहवन हे विधी घेण्यात आले. माजी नगरसेवक रामदास टेके, व्यापारी मुकुंद दाभाडे, राजीव लाडवाणी, सुरेश टेके , नगरसेवक प्रकाश चव्हाण, दशरथ बनकर, ज्ञानेश्र्वर टेके, प्रकाश बोथरा, भिकन लहामगे, रवींद्र साखरे, हरेश पालेजा, भगवान व्यवहारे, सावनसिंग राजपुत , विलास रामैय्या, राजु टेके यांनी हजेरी लावली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जेष्ठ नागरिक अशोक धसे, साळी समाजाचे माजी अध्यक्ष समीर लोंढे, किशोर अहीरे, अनील गुळस्कर , जिंतेद्र खडमकर, धृवा गुळस्कर, संतोष गुळस्कर, रोहीत गुळस्कर, संजय आढाव, संतोष आहीरे, शुभम पारे, अशोक मांजरे, डॉ. अशोक सरोदे, शितल रोजेकर, आकाश खडमकर, अश्र्विन रावकर, रोशन धसे, संदीप धसे, अविनाश कळंके, अनिल आहिरे, रवी आहिरे, सतिश सातपुते,गणेश कांबळे,दीपक कांबळे, ओमकार सरोदे, मंथन खडमकर, कमलबाई लोंढे, चंद्रकला मांजरे, तारामती धसे, ज्योती हांगे, सारीका लोंढे , प्रतीभा खडमकर, रत्ना आहीरे, रोहीणी आहीरे, मनिषा धसे ,सुजाता धसे, कलावती लोकरे यांनी प्रयत्न केले.

------------------------------------

# डोणगावच्या लेंभे व डोखे वस्ती येथे घरोघरी शाळा उपक्रम

**पुणतांबा (वार्ताहर)**– वैजापूर तालुक्यातील डोणगाव येथील लेंभे व डोखे वस्ती येथे घरोघरी शाळा या उपक्रमांतर्गत इ. १ ली ते ४ थीच्या एकूण ५ विद्यार्थी गटासाठी घरातच तयार करण्यात आलेल्या स्वतंत्र शाळेची सुरुवात इयत्ता चौथीच्या रूद्र गजेंद्र लेंभे याच्या घरात करण्यात आली. उपक्रमशिल शिक्षिका शर्मिला विधाटे यांच्या उपक्रमाबद्दल कौतुक करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी शिक्षकांनी याच पद्धतीने उपक्रम राबविले पाहिजे, असे वैजापूर पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी मनीष दिवेकर यांनी स्पष्ट केले.

करोनाच्या प्रादुर्भावामुळे शाळा बंद असल्याने शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांचे शिक्षण प्रभावीपणे सुरू राहण्यासाठी जि. प. प्रा. शाळा लेंभे व डोखे वस्ती शाळेच्या



सहशिक्षिका शर्मिला विधाटे यांनी घरोघरी शाळा हा अभिनव उपक्रम राबविला आहे. या उपक्रमांतर्गत प्रत्येक विद्यार्थ्यास शैक्षणिक साहित्याचा संच विनामूल्य देऊन या उपक्रमामध्ये गोष्टीचे पुस्तक वाचन, शब्द वाचन, तक्ते वाचन, गणित, इंग्रजी व मराठी पेटी साहित्य पाठांतरावर भर दिला जात आहे, असे शर्मिला विधाटे यांनी स्पष्ट केले.

यावेळी गटशिक्षणाधिकारी मनीष दिवेकर, विषयतज्ञ श्री. बागुल, लाडगाव केंद्राचे केंद्रप्रमुख ठाकरे, सोनवणे, धायतडक उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक कल्पना खांदे यांनी केले. सुत्रसंचालन अमोल गमे तर शर्मिला विधाटे यांनी आभार मानले.

# घरोघरी शाळा

## कोरोना काळातील शिक्षणाची एक नवी दिशा



शिक्षण ही अखंडपणे चालणारी प्रक्रिया असताना गेल्या दीड-दोन वर्षांपासून कोरोना सारख्या महामारी मुळे शिक्षण प्रक्रिया ठप्प झाली. त्यामुळे बालकांचे आरोग्य धोक्यात आले पण शाळा बंद असल्यामुळे त्यांचे भविष्य अंधकारमय झाले. आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात कसे आणावे हा प्रश्न झोप येऊ देत नव्हता. शाळा चालू होतील की नाही? की दर वर्षी विना अभ्यास विना परीक्षा विद्यार्थी पुढील वर्गात ढकलावा लागेल याचा सतत विचार येई आणि असे सतत वाटत आहे की काहीही करुन आपले सर्व विद्यार्थी या शिक्षण प्रवाहात अखंडपणे सामील झाले पाहिजे.

**महाराष्ट्र शासनाने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध केले. त्यातीलच एक पर्याय म्हणजे 'ऑनलाइन शिक्षण' आमच्या शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती खांदे कल्पना रायभान व मी सहशिक्षिका विधाटे शर्मिला अशोक आम्ही दोघेही ऑनलाईन क्लास घेतो, परंतु १००% पालकांकडे स्मार्टफोन नाहीत आणि असले तरी नेटवर्क प्रॉब्लेम किंवा बॅलन्स नसणे मोबाईल घ्या म्हटले तर पैसेच नाहीत, असे म्हणणारे पालकही भेटले या व अशा अनेक अडचणी आल्या आणि माझे प्रामाणिक मत असे होते की, ऑनलाईन क्लास घेतल्यानंतर सर्व मुले अभ्यास करतात असे नाही, ते फक्त ऑनलाईन क्लासला आपल्यासमोर बसलेले असतात परंतु क्लास संपल्यानंतर मात्र काय ? असा एक प्रश्न आम्हाला चिंतित करत होता.**

एक शिक्षिका म्हणून विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षणाची ज्योत अखंडपणे तेवत राहण्यासाठी काय करता येईल ? याचा विचार करत असताना सोशल मीडियावर सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडगाव येथील मुख्याध्यापक संजय लक्ष्मण खरात यांची संकल्पना असलेला 'घरोघरी शाळा' हा उपक्रम माझ्या पाहण्यात आला आणि मी माझ्या सर्व विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात आणून नक्कीच टिकवून ठेवू शकेल असा विश्वास मला वाटू लागला. शाळा बंद असल्याने विद्यार्थी शाळेत येऊ शकत नाहीत मग जर शाळाच विद्यार्थ्यांच्या घरी घेऊन जात आली तर ?

**झाले माझ्या मनाने ठाम निश्चय केला की, काहीही झाले तरी हा उपक्रम आपल्या शाळेत राबवायचा. मी खरात सराशी संपर्क साधून उपक्रमाची सर्व माहिती घेतली व माझ्या मुख्याध्यापिका खांदे मॅडम यांना सांगितली अर्थात त्यांची परवानगी मिळाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी इयत्ता चौथीचा विद्यार्थी रुद्र गजेंद्र लेंभे याच्या घरात अभिनव शाळा साकार करण्यासाठी मी सुरुवात केली. अशा तीन शाळा दोन महिन्यांत तयार झाल्या. उपक्रमाचे उद्घाटन झाले. प्रसंगी वैजापूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी मनीष दिवेकर सर यांनी रुद्र व इतर इयत्ता १ ते ४ च्या विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले कोरोनाचे सर्व नियम पाळून हा उपक्रम राबविण्याचे पालकांना आश्वासन देऊन उपक्रमाला सुरुवात केली. विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेप्रमाणे शैक्षणिक साहित्य तयार करून घराच्या भिंतीवर लावले. मुळाक्षरांचे कार्ड, सोपे शब्द, वाक्य वाचन, जोड शब्द, गार्डन ऑफ वर्ड्स, म्हणी, वाक्प्रचार, पाढे इत्यादी असणारे तक्ते इंग्रजी वाचन कार्ड हे साहित्य सतत नजरेसमोर राहील या पद्धतीने मुलांच्या घरात लावण्यात आले व काही स्वनिर्मित साहित्य छोट्या-छोट्या टोपल्यांत ठेवण्यात आले यामुळे विद्यार्थ्यांसोबत त्यांचे पालक व मोठे भावंड ही शिक्षणाचा आस्वाद घेऊ लागले.**

जे विद्यार्थी अभ्यास कमी व खेळ जास्त या गटात बसतात अशा मुलांसाठी त्यांच्या घराच्या आत, घराबाहेर भिंतीवर, प्लास्टिकच्या पाईपवर, तुळशीवर शेडचा खांबावर जिथे जागा असेल तेथे अक्षरे व अंक रेखाटली जेणेकरून आनंदी वातावरणात विद्यार्थी हसत- खेळत अध्ययन करू लागले. घरातच शाळा तयार झाल्यामुळे घरातील आजी आजोबा देखील अक्षरे वाचू लागली व नातवांकडून वाचन करून घेऊ लागली.

**कोणतेही बंधन नसल्यामुळे विद्यार्थी आनंददायी शिक्षण घेऊ लागली आणि खऱ्या अर्थाने ज्ञान रचनावाद सफल झाला. ऑनलाइन शिक्षण पद्धतीत राहिलेल्या त्रुटी 'घरोघरी शाळा' उपक्रमामुळे दूर करण्यात मला यश आले. यात मला माझ्या मुख्याध्यापिका, माझे पालक, ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समितीचे मोलाचे सहकार्य मिळाले.**

आज अखेर आमच्या ३८ पटापैकी एकूण २५ विद्यार्थी घरोघरी शाळा या उपक्रमात सहभागी होऊन आनंददायी शिक्षण घेत आहेत आणि उर्वरित विद्यार्थ्यांच्या घरी शाळा तयार करण्याचा माझा वसा अविरत चालू ठेवून सर्व विद्यार्थी प्रगत करण्याचा माझा निश्चय आहे.

शेवटी असे म्हणेल की जिथे लागतो बालकांना लळा अशी माझी घरोघरी शाळा"

**श्रीम. विधाटे शर्मिला अशोक**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लेंभे डोखे वस्ती, केंद्र - लाडगाव

ता. वैजापुर जि. औरंगाबाद

# समारोप

नवोपक्रम राबवला- सर्व विद्यार्थ्यांची पूर्वचाचणी घेतल्यानंतर, अध्ययन निष्पत्ती पाहिल्यानंतर त्यात इयत्तेनुसार प्रत्येक विद्यार्थ्याच्या घरामध्ये ज्याची त्याची स्वतंत्र शाळा तयार केली. या घरोघरी शाळे द्वारे प्रत्येक विद्यार्थ्याचा गृहभेटी द्वारे अभ्यास घेऊ लागले व तपासून विद्यार्थ्यांना पुढचा अभ्यासही देऊ लागले. अशा पद्धतीने सर्व विद्यार्थी या नवोपक्रमात सहभागी होऊन अपेक्षित अध्ययन निष्पत्ती प्राप्त करू लागले.

जून 2019 मध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन गृहभेटी मध्ये त्यांचा अभ्यास तपासल्यानंतर असं जाणवलं की सर्व विद्यार्थी स्वतःचे नाव सुद्धा लिहू शकत नव्हते. सर्व मूलभूत गणिती क्रिया सुद्धा त्यांना येत नव्हत्या. जणू काही ते सर्व  विसरले होते. तेव्हा माझ्या मनाला असं कुठेतरी वाटलं की, आपण शिक्षक असून या विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये शिक्षणाची ज्योत अखंडपणे तेवत राहण्यासाठी काय करता येईल?नियमितपणे शाळा चालू होती तेव्हा सर्व विद्यार्थी अतिशय छान पद्धतीने अभ्यास करून पुढे जात होते. परंतु आता जर त्यांना स्वतःचे नाव सुद्धा लिहिता येत नव्हतं तर आपण असे काहीतरी करायला हवे की जेणेकरून आपले सगळे विद्यार्थी अध्ययन अनुभव अतिशय चांगल्या पद्धतीने आत्मसात करतील व गुणवत्तेत टिकून राहतील.ही माझी अस्वस्थता मला झोप येऊ देत नव्हती, त्यासाठी मी सतत विचार करत होते की काही ना काही तरी करून आपण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचुन त्यांना अखंड अध्ययन प्रक्रियेत सामावून घेता आले पाहिजे.

माझ्या विद्यार्थ्यांसाठी काहीतरी करायला हवे या उद्देशाने विचार करत असताना सोशल मीडियावर मला घरोघरी शाळा हा  उपक्रम माझ्या पाहण्यात आला. हा उपक्रम माझ्या शाळेमध्ये राबवण्याचे ठरवले आणि त्या पद्धतीने सर्व विद्यार्थ्यांच्या घरात एक एक करून शाळा साकार करत गेले आणि या नवोपक्रमातून मला माझ्या विद्यार्थ्यांमधील अपेक्षित अध्ययन निष्पत्ती सहज साध्य करता आल्या. आणि या पद्धतीने माझी हुरहूर थांबली आणि माझे कुतूहल सुद्धा दूर झाले.

आलेल्या अडचणी दूर करता आल्या कोरोना सारख्या आलेल्या जागतिक महामारी मुळे सर्व विद्यार्थ्यांच्या भविष्यात निराशेचे वातावरण दिसून येत असताना मी स्वतः माझ्या शाळेत राबवलेला हा जो घरोघरी शाळा नवोपक्रम आहे त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत येणाऱ्या सर्व अडचणी मला या नवोपक्रमाद्वारे दूर करता आल्या.यात प्रत्येक विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांच्या  घरातील सर्व सदस्यांशी संपर्क साधून त्यांची परवानगी घेऊन हा नवोपक्रम साकार करत गेल्याने पालक शिक्षक व विद्यार्थी हे शैक्षणिक त्रिकूट पूर्ण झाले.

प्रत्येक विद्यार्थ्यांच्या घरात राबवलेला हा घरोघरी शाळा  नवोपक्रम याद्वारे सर्व विद्यार्थी घरातील सर्व सदस्यांच्या मदतीने अध्ययन करू लागली किंवा घरातील व्यक्ती बाहेर कामानिमित्त गेल्यावर स्वतः स्वयंअध्ययन करू लागली. व त्याद्वारे सर्व विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढत गेली. अपेक्षित

अध्ययन निष्पती साध्य झाल्या.त्यामुळे शिक्षण सुरू राहिले व सर्व विद्यार्थी अध्ययन प्रवाहात टिकून राहिले.अशा या अभिनव नवोपक्रमाची दखल आमच्या वैजापुर तालुक्याचे सन्माननीय गटशिक्षणाधिकारी श्री मनीष दिवेकर साहेब यांनी घेऊन सर्व विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासून समाधान व्यक्त केले.व त्याचप्रमाणे वैजापुर तालुक्याचे सन्माननीय प्राध्यापक आमदार श्री रमेश बोरणारे साहेब यांनी सुद्धा सदिच्छा भेट देऊन समाधान व्यक्त केले व कौतुकही केले सर्व पालकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.कारण त्यांची मुले हसत खेळत व आनंददायी वातावरणात अखंडपणे अध्ययन करू लागली. अशाप्रकारे उपक्रमांची गुणवत्ता अतिशय उत्कृष्टरित्या वाढली.

घरोघरी शाळा हा नवोपक्रम मी माझ्या शाळेत राबविल्यानंतर त्याच्या अपेक्षित अध्ययन निष्पत्ती साध्य झाल्यानंतर शेजारी असणाऱ्या इतर शाळांमध्ये सुद्धा हा नवोपक्रम त्यांनी सुरू करण्याचे ठरवले. त्याचप्रमाणे इतर सर्व शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना सुद्धा उपयुक्त असा हा नवोपक्रम ठरलेला आहे. व बाकीच्या इतर शिक्षकांनी सुद्धा तो त्यांच्या शाळेत राबवण्याचे ठरवले.

घरोघरी शाळा हा नवोपक्रम कोरोना काळात थांबलेल्या शिक्षणाला गती देण्याचा एक प्रयत्न.या उपक्रमातून गुणवत्ता वाढ होण्यास नक्कीच मदत झाली आहे. मुळात नवोपक्रम हे अशा परिस्थितीत न थांबता पुढे राहण्यास गतिमान करतात.

सर्व विषयांचे अध्ययन अनुभव विद्यार्थ्यांच्या स्वतःच्या घरात देणे सहज शक्य झाले. पालकांचे सहकार्य खूप मिळाल्याने हा नवोपक्रम एक प्रकारची ऊर्जा देऊन गेला.

मुळात हा नवोपक्रम मला या काळात ही एक नवी जिद्द व आव्हान पेलण्याची शक्ती देऊन गेला आहे. माझ्या व माझ्या विद्यार्थ्यांमधील सुसंबंध आई व मुलांसारखे करून देणारा हा नवोपक्रम ठरला. शिक्षण क्षेत्रात गेल्या अकरा वर्षातील मला बरेच काही शिकण्याची व विद्यार्थी हिताचे कार्य करण्याचे भाग्य देऊन गेला आहे.

**" वादळी संकटात जिद्द नवी**

**पेलते आव्हान हे नैसर्गिक**

**ज्ञानदीप हे उजळण्या**

**कर्मरूपी वाहतेय स्वतःला "**

नवोपक्रम स्पर्धेमुळे राज्यभरातील शिक्षकांना आणखी नवी ऊर्जा मिळते. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र चे मनःपूर्वक आभार.

**श्रीमती विधाटे शर्मिला अशोक**

# संदर्भसूची व परिशिष्ट्ये

## संदर्भग्रंथ


1. दिशा नवोपक्रमाची-म. रा.शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे

2. शालेय नवोपक्रम- म.रा.शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे

3. इयत्ता 1 ली ते 4 थी ची सर्व पाठयपुस्तके

4. इयत्ता 1 ली ते 4 थीच्या अध्ययन निष्पत्ती पुस्तिका

5. शैक्षणिक नवोपक्रम- श्री.एस आर.माशाळे

6. दीक्षा पोर्टल

7. कृतिसंशोधन व नवोपक्रम, सुविचार प्रकाशन मंडळ पुणे स्वाती( 2006)

8. शिक्षणातील नवे प्रवाह व नवप्रवर्तन,नूतन प्रकाशन, पुणे जगताप ह. ना. (1995)

9. कृतिसंशोधन व नवोपक्रम, फडके प्रकाशन मंडळ कोल्हापूर. साळी व.सा,करंदीकर सुरेश, अहिरे बी.जी .(2006)

10. ज्ञानरचनावाद एक यशस्वी प्रयोग,, राज अहमद अब्बास देसाई

11. ज्ञानरचनावादी वर्ग अध्यापन डॉ. हेमलता पारसनीस

12. ज्ञानरचनावादातील कार्यनिती डॉ. जयश्री अत्रे

13. जीवन शिक्षण मासिक, जून, जुलै ,ऑगस्ट ,सप्टेंबर 2019.

14.युट्युब लिंक

https://youtu.be/7_BjMmcx1Hc
https://youtu.be/cUPXTzQPOiA
https://youtu.be/_rArQQOYTiw
https://youtu.be/qTft3eZDQCk

## परिशिष्टे

नवोपक्रमासंबंधी यु ट्यूब वर अपलोड केलेल्या links

| अ.क्र. | links |
|---|---|
| १ | https://youtu.be/ZV9R9-CLvPs |
| २ | https://youtu.be/0DspDfYvKZA |
| ३ | https://youtu.be/tsvMGc84370 |
| ४ | https://youtu.be/-wbffNNPk-4 |
| ५ | https://youtu.be/2haepUhXLbY |
| ६ | https://youtu.be/wc182RHaYEQ |
| ७ | https://youtu.be/jmrX1J6rJS0 |

# अभिप्राय

## प्रा. रमेश नानासाहेब पा. बोरनारे

**आमदार** (वैजापूर, गंगापूर)
ता. वैजापूर, जि. संभाजीनगर (औरंगाबाद)
**सदस्य – सार्वजनिक उपक्रम समिती**

कार्यालय :- 'वरदहस्त', मुरारी पार्क, गंगापूर रोड, वैजापूर - ४२३ ७०१, जि. औरंगाबाद. ☎ : (०२४३६) २२२८२०, मो. ९४२२२३६८९२

जा.क्र. :

दिनांक : 26/10/202)

प्रति,

**श्रीमती शर्मिला अशोक विधाटे,**
**सहशिक्षिका – जि.प.प्रा. शा. लेंभेडोखेवस्ती,**
**ता. वैजापुर जि. संभाजीनगर (औरंगाबाद).**

**सप्रेम जयमहाराष्ट्र....!**

कोविड – १९ महामारीच्या काळात "घरोघरी शाळा" या उपक्रमाअंतर्गत आपण अत्यंत प्रभावी आणि कल्पक नियोजन करून त्याची अंबलबजावणी करत सर्व विदयार्थ्यांना घरच्या घरीच हसत खेळत अध्ययन करण्यासाठी संधी उपलब्ध करून दिल्या त्यामुळे नक्कीच विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान थांबले आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता देखील वाढली.

संकटकाळात विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी समर्पित भावनेने आपण एक प्रभावी उपक्रम राबविला, त्याबद्दल आपले मनस्वी अभिनंदन आणि पुढील कार्यास मनपुर्वक शुभेच्छा...!!!.

आपला स्नेहांकित

**प्रा. रमेश नानासाहेब पा. बोरनारे**
( विधानसभा सदस्य )

Scanned with CamScanner

**वैजापूर तालुक्याचे विद्यमान आमदार प्रा.रमेश बोरनारे साहेबांची नवोपक्रमास सदिच्छा भेट**

दिवेकर एम. एस.
ग.शि.अ. पं.स. वैजापूर
दि. 24.08.2021

आज दि. 24.8.21 रोजी 'घरोघरी शाळा' या उपक्रमाचे उद्घाटन प्रसंगी जि.प. प्रा.शा. लिंभेजोरवे वस्ती केंद्र लाडगाव ता. वैजापूर या शाळेला भेट दिली.

- शाळेतील शिक्षिका श्रीम. रवांदे (प्र.मु.अ.) व श्रीम. विघाटे यांनी घरोघरी शाळा या उपक्रमाचे अत्यंत प्रभावी नियोजन केल्याचे प्रत्यक्ष भेटीत दिसून आले.

- शाळेत इयत्ता 1 ते 5 मध्ये एकूण 38 विद्यार्थी प्रवेशित आहेत. या सर्वांसाठी तीन पालकांचे घरी प्रत्यक्ष वर्ग सुरु करण्यात आले आहेत. याबाबत संबंधित पालकांचे मनस्वी अभिनंदन!

- विद्यार्थी अध्ययन व्हावे यासाठी विविध प्रकारची शै. साधने तयार करून विद्यार्थी स्वतः शिकतात. साहित्य हाताळतात, कृती करतात. एकमेकांच्या मदतीने सुद्धा शिकतात.

- या कामास पालकांचे उत्तम सहकार्य आहे. तालुक्यातील 'घरोघरी शाळा' हा एकमेव उपक्रम इथे सुरू आहे. त्यासाठी दोन्ही शिक्षिकांचे अभिनंदन. श्रीम. विघाटे यांनी परिसरातील विविध ठिकाणी स्व हस्तलिखीत साहित्य व पेंटिंग करून दर्जेदार शिक्षणाची संधी निर्माण करून दिली आहे. त्यांचे अभिनंदन.

पुढील कार्यास शुभेच्छा

के.प्र. लाडगाव    विषयतज्ज्ञ BRC वैजापूर    24/8/21

वैजापूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री .दिवेकर साहेब यांची नवोपक्रमास भेट व यांचा अभिप्राय

# पालक अभिप्राय

## -पालक अभिप्राय-

वाल्मिक कचरु कहां।३०


माझी मुलगी दिव्या वाल्मिक कहांडळ, [redacted] व समिक्षा वाल्मिक कहांडळ. या दोघी इ. २ री व ३ री मध्ये शिकत आहे. या शाळेतील मॅडम विघाटे यांनी घरोघरी जो प्रोग्राम राबविला आहे. त्याबद्दल आमची मुली खुप हुशार झाल्या. मॅडम आमच्या घरी येऊन घरांवर व भिंतीवर पाढे, आणि विविध प्रकारचे तक्ते लिहुन चिकटवले आहे. त्यामुळे आमच्या मुली खेळतांना त्या ते पाढे वाचन करु लागल्या. आम्ही जरी शेतात कामाला गेलो तरी त्यांची आजी, आजोबा त्यांच्याकडन वाचून करून घेतात. हा जो प्रोग्राम मॅडम ने राबविला आहे. त्यापासून आमच्या मुली खूप हुशार, आणि त्यांच्यामध्ये प्रगती आम्हाला खूप दिसते.

आणि या लॉकडाऊनच्या काळात आमच्या मुलींची शाळा बंद आहे, असे वाटतच नाही. आणि आम्हाला अभिमान आहे की, आमच्या मुली शिकत आहे. आणि [redacted] मॅडम ने पण खूप प्रतिसाद देऊन आमच्या मुली खूप हुशार झाल्या. जर असा प्रोग्राम जर घरोघरी राबविला तर मुलं मागे राहणार नाही.

सौ. रोहिणी वाल्मिक कहांडळ.

R.V.K

FOR EDUCATIONAL USE



श्री कुणाल संभाजी डोखे

आमच्या शेजारील मुलगा कृणाल दिलीप सोनवणे हा मुलगा इ. ३री मध्ये शीकत असून त्यांच्या मॅडम सौ सुनीता डोखे यांनी तो ज्या जागेवर खेळतो तेथे ~~भिंत~~ "वारंवार व पोलवर पाढे व बाराखडी लिहीली व तो खेळता खेळता वाचन व पाठांतर करतो त्याला पहीले काही ~~जा~~ जास्त पाठांतर व पाढे येत नव्हते. आता त्याला बरेचसे पाठांतर व पाढे खुपच जास्त प्रमाणात येत आहे

मॅडमने तर्फे घरोघरी शाळा दिली आहे त्याकडे खुप प्रमाणात सुधार आले आहे.

येथुन पुढे हा उपक्रम चालू राहणार आहे

आणी आम्ही पण हा उपक्रम साथ देणार आहे.

कुणाल संभाजी डोखे

Bokle

- शिक्षकमित्र -

श्री. मिलिंद श्रीमंत पुजारी

माझा मुलगा शिवम मिलिंद पुजारी हा इ. ३ मध्ये शिकत आहे. त्यांच्या मॅडम सौ शर्मिला डोखे यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या घरोघरी जावून तक्ते लावून प्रत्येक मुलांना हे वाचता येते की नाही. हे लक्षात घेवून प्रत्येक मुलांना व पालकांना त्यांना ह्या उपक्रमाबद्दल माहित दिली. आणि आई-वडील जरी घरी नसले तरी आजी-आजोबा मुलाकडे लक्ष देवू शकता. आणि घरोघरी शाळा हा उपक्रम राबवला. तो अगदी चांगला झालेला आहे. व माझ्या मुलाला व्यतिरीत असताना १३ ते २४ पर्यंतचे पाढे. व शब्द वाचन, शरीराचे अवयव हे बिनचुक पने पाठ करता आले. व कोरोनाच्या काळात हा उपक्रम राबवल्यामुळे खुप चांगला आहे. आणि मी धन्यवाद देतो की शाळेतील मॅडम, व कर्मआधिकारी यांना की त्यानी माझ्याच नाही तर सर्व मुलांना अभ्यासामुळे वंचित नाही केले. आणि मुलांना घरी माझीच माझी शाळा आहे. असे वाटते. मुलेही चांगल्या पद्धतीने लक्ष देतात.

श्री. मिलिंद श्रीमंत पुजारी
Pujare. M.S

माझे नाव:- मच्छिंद्र रामभाऊ धुमाळ
माझी मुलगी सिद्धी मच्छिंद्र धुमाळ इयत्ता ४ थी
समृद्धी मच्छिंद्र धुमाळ इयत्ता २ री मध्ये शिकतात
कोवीड 19 काळामध्ये दोन वर्ष पासुन राज्यात शाळा बंद आहे त्यामुळे मुलांच शिक्षणाचे खुप नुकसान झाले आहे. मुले शिक्षणापासुन वंचीत राहू नये म्हणुन आमच्या शाळेच्या मॅडम. श्रीमती विधाटे ताई यांनी एक खुप छान प्रकल्प चालु केला आहे.
॥००॥ घरोघरी शाळा ॥००॥

मॅडम प्रत्येकाच्या घरी येऊन घराच्या भिंतीवर तक्ते, वाचन चित्ररूप माहिती नामी व नोटा भागाकार जोडशब्द विरुद्ध अर्थ शब्द असा वरसा अभ्यास मॅडम घरी येवुन घेतात

मॅडमने ३हा प्रकल्प चालु केल्यापासुन माझ्या मुलीमध्ये ८०% फरक झाले.
माझ्यामते तालुका पातळीवर प्रत्येक शिक्षकाने हा प्रकल्प चालु जर केला तर एकही मुलगा आडानी राहणार नाही.

मच्छिंद्र रामभाऊ धुमाळ

श्री गजेंद्र मच्छिंद्र लेंभे

माझा मुलगा रुद्र गजेंद्र लेंभे इ. ४ थी मध्ये शिकत आहे. लेंभे डोळे वस्ती शाळेतील मॅडम शर्मिला विधाटे यांनी घरोघरी शाळा उपक्रम राबीवला आहे. त्या उपक्रम मुळे माझा मुलगा करोना काळात देखील हुशार झाला. मॅडम यांनी घरा मध्ये चिटकवलेले चित्र ओळ अक्षरे, समान अर्थी शब्द विरुद्ध आर्थी शब्द असे अनेक प्रकारची चित्र व फोटो लावल्याने माझा मुलगा सकाळी उठल्यापासून ते सायंकाळ पर्यन्त त्याचे आध्यायन करतो त्यामुळे त्याचे पाठ. इंग्रजी अक्षर बेरिज, गुणाकार, भागाकार यांची योग्य प्रकारे समजावून घेतो तसेच घरात असलेले आई वडील देखील त्याचा योग्य प्रकारे अभ्यास करून घेतात दररोज सकाळी online call घेत असल्याने देखील चांगल्या प्रकारे सुधारणा झाली

मॅडम यांनी करोना काळात देखील सर्व नियमांचे पालन करून योग्य पद्धतीने घरी शाळा तयार केल्याने मी व माझे घरातील सर्व मॅडमचे आभारी आहे. आणि करोना काळात देखील माझा मुलगा मागे राहणार नाही याची मला खात्री आहे

श्री गजेंद्र मच्छिंद्र लेंभे

Glembhe.

FOR EDUCATIONAL USE

## उपक्रम.

माझे नाव :- विजय शिवनाथ पानसरे.

माझी मुलगी कावेरी विजय पानसरे व मोहिनी विजय पानसरे या दोघी ४ थी व २ री मध्ये शिकत आहेत. त्याच्या शाळेमधील विद्याटे मॅडम यांनी जो घरोघरी उपक्रम राबीवला आहे. त्याच्यात सर्व विद्यार्थी सहभागी आहे. आणि त्या उपक्रमामुळे आमचे मुली खूप हुशार झाल्या आहेत. कोरोनाकाळामधी अंत्यत मुलाचे शिक्षण फारच कमी झालते. पण ह्या उपक्रमामुळे मुलं भरपूर मनामासून अभ्यास करतात.

विद्याटे मॅडम यांनी सर्वाच्या घरी जाऊन मुलांना तक्ते लावून दिले. ज्यानी मुलांनी अभ्यास करावा. मॅडम नी विविध प्रकारचे तक्ते लावले आहे ज्यांनी की मुलांचे शिक्षणाचे नुकसान होणार नाही. मी जरी कुठं बाहेर गेलो तरी घरी मुलं अभ्यास करतात. मॅडम नी केलेला उपक्रम आम्हाला खूप आवडला. त्या उपक्रमामुळे मुलं मनापासून अभ्यास करतात. आम्हाला पण वाटते की. उपक्रमामुळे मुलांचे शिक्षणावर खूप मोठा प्रभाव पडतोय. मुलांची प्रगती होतेय. आम्हाला खूप आनंद वाटतो की मुल शिक्षणापासून वंचित राहूनये. आम्हाला खूप आनंद वाटतो की आमच्या मुली विद्याटे मॅडम कडं शिकता. आणि नक्कीच उपक्रमामुळे माझ्या मुलींचे कल्यान होईल. असे मला वाटते. मला आनंद आहे की विद्याटे मॅडम कोरोणाची पण खूप दक्षता घेऊन आम्हाच्या मुलींला सहकार्य करताय.

— कृपया सर्वानी काळजी घ्यावी ही माझी नम्र विनती आहे.

विजय शिवनाथ पानसरे.

VSP.

# प्रतिज्ञापत्र व प्रमाणपत्र

**प्रतिज्ञापत्र**

मी श्री/श्रीम/कुं. विघाटे शर्मिला अशोक...... प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला, "जिथे लागे बालकांना लळा अशी माझी घरोघरी शाळा", हा नवोपक्रम माझ्या स्वतःच्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वतःला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

Swighate.
स्पर्धकाची स्वाक्षरी

दिनांक : 27.10.2021

नाव श्रीम. विघाटे शर्मिला अशोक

स्थळ :
जि.प.प्राथ.शाळा, लेंभेडोखेवस्ती
डोणगाव ता- वैजापूर
जि- औरंगाबाद

शाळेचा /कार्यालयाचा शिक्का.
जि.प.प्राथ.शाळा, लेंभेडाखे वस्ती
केंद्र-लाडगाव, ता.वैजापूर
जि.औरंगाबाद

**प्रमाणपत्र**

जि.प.प्राथ.शाळा, लेंभेडाखे वस्ती
केंद्र-लाडगाव, ता.वैजापूर
जि.औरंगाबाद

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीम/कुं. विघाटे शर्मिला अशोक ............ हे माझ्या शाळेत / कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला "जिथे लागे बालकांना लळा, अशी माझी घरोघरी शाळा," हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष 2021-2022 मध्ये त्यांनी स्वतः राबविलेला असून ती त्यांच्या स्व परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

Kherdekar
मुख्याध्यापक
जि.प.प्राथ.शाळा, लेंभेडाखे वस्ती
केंद्र-लाडगाव, ता.वैजापूर
जि.औरंगाबाद

दिनांक : 27.10.2021

शाळा/ कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

स्थळ :
जि.प.प्राथ.शाळा, लेंभेडोखेवस्ती
ता- वैजापूर, जि- औरंगाबाद

नाव : श्रीम. खांदे कल्पना रायभान

शिक्का: